**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ७७/२००९**

जा.क्र. दि.

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री अशोक सुखदेवराव बोर्डे
माजी सरपंच, ग्रामपंचायत इसापुर
ता.तेल्हारा जि.अकोला

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागिय अधिकारी,
अकोट जि.अकोला

२. जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार, तेल्हारा
जि.अकोला

(आदेश पारीत दिनांक ०४/०१/२०१०)

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री जि.डब्ल्यु.इंगळे, लघुलेखक हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे श्री बी.एन.चव्हाण, नायब तहसीलदार हजर आहेत व त्यांनी खुलासा सादर केला आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रपत्र अ प्रमाणे दि. १५/१०/२००८ रोजी तहसीलदार, तहसील कार्यालय, तेल्हारा यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये १५/१०/०८ चे प्रपत्र अ नुसार अर्जदाराला माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सुध्दा माहिती दिली नाही म्हणुन द्वितीय केले असे अर्जदाराने नमुद केले आहे. १५/१०/०८ ला प्रपत्र अ प्रमाणे अर्जदाराने माहिती मागितली होती ती ९ मुद्दयांमध्ये मागितली होती. त्यानंतर अर्जदाराने कलम १९(१) नुसार प्रथम अपिल क्र. ३८/०८ दाखल केल्यानंतर अर्जदार व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार तेल्हारा यांना नोटीस काढुन २२/१२/०८ , १२/१/०९ व ७/२/०९ रोजी सुनावणी करीता बोलावण्यात आले होते. अपिलकर्ता सदर सुनावणीचे वेळी गैरहजर होते व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हे हजर झाले. तहसीलदार तेल्हारा यांनी मौखिक सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्न स्वरुपात असुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदाराला कार्यालयामध्ये उपलब्ध अभिलेख पुरविणे अपेक्षित आहे. तहसीलदार यांचे मौखिक म्हणणे ऐकले. उपविभागिय अधिकारी अकोट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्याच्या प्रती पुरविणे बंधनकारक आहे असे म्हटले परंतु अपिलकर्ता यांना ग्रामपंचायत इसापुर ता.तेल्हारा येथील

**ई वर्ग, एफ वर्ग**, शासकीय गायराण असलेल्या जमिनीवर ग्रामपंचायत सदस्य यांनी ट्रॅक्टर नांगरटी-फंटन करुन गुरांचा चारा नष्ट केल्यावरुन चौकशी बाबतची माहिती पुरविण्याबद्यल जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना आदेशीत केले . तसेच जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार तेल्हारा यांनी अपिलकर्ता यांना माहिती विनामुल्य पुरवावी असा आदेश दिला होता. सदर आदेश दि. ९/२/०९ रोजी पारीत करण्यात आला होता. प्रथम अपिलामध्ये आदेश झाल्यानंतर सुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री आर.बी.चापे यांनी अर्जदाराला माहिती पुरविली नाही. तहसीलदार यांनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये सदरची जबाबदारी श्री एम.एस.कुलथे, नायब तहसीलदार यांचेवर टाकली होती. श्री एम. एस. कुलथे यांनी उपलब्ध माहिती अर्जदाराला पाठविली असे कुठेही लिहलेले नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(१) नुसार निकाली काढलेला नाही त्याकरीता तत्कालीन तहसीलदार तेल्हारा यांना व माहितीचा अधिकार अधिनियम,. २००५ चे कलम ५(५) नुसार श्री एम.एस.कुलथे, तत्कालीन नायब तहसीलदार तेल्हारा यांना दोषी ठरविण्यात येवून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(२) नुसार त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते व खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

- **आदेश** -

१. विभागिय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना आदेश देण्यात येतो की, श्री आर.बी.चापे, तत्कालीन तहसीलदार तेल्हारा व श्री एम.एस.कुलथे, तत्कालीन नायब तहसीलदार तेल्हारा यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(२) नुसार त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची वर शिफारस केल्यानुसार कारवाई करुन तसा अहवाल या आयोगास ६ महिन्याचे आत पाठवावा.

२. हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाचे आत प्रथम अपिलामधील आदेशानुसार माहिती अर्जदाराला रजिष्टर पोष्टाने सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी पाठवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

अर्जदाराला माहिती न मिळाल्यास अर्जदाराने हया आयोगाकडे कलम १८ नुसार तक्रार करावी.

**वरीलप्रमाणे आदेश देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत - विभागिय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती**

जिसकार/